नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 11/09/2020 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## . जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 08 कि. मी. मौजा मांगली शिवार येथे दिनांक 09/09/2020 चे 21.30 वा. ते 22.30 वा. दरम्यान रामटेक पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन रामटेक पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 31/सीक्यु – 6049 क्रमांकाच्या टाटा मॅक्स गाडीला थांबवुन तपासणी केली असता त्यामध्ये आरोपी नामे– मोहम्मद आमीर रजा मोहम्मद नयीम, वय 23 वर्ष, रा. कामठी हा त्याचे टाटा मैक्स गाडी मध्ये दोन म्हशी व एक वघार यांना त्याचे वाहनामध्ये बसण्याची व उभे राहण्याची पुरेशी जागा न ठेवता त्यांना ईजा होईल अश्या स्थितीत निष्काळजी व कुरपणे क्लेशदायक पध्दतीने चारा पाणीची व्यवस्था न करता त्यांचे दोन्ही पाय दोराने बांधुन घेवुन जातांनी मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातील दोन म्हशी प्रत्येकी कि. अंदाजे 9,000/– रू अशा एकुण 18,000/– रू व एक वघार कि. 5,000/– रू. असा एकुण 23,000/– रू. चे जनावरे व टाटा मैक्स गाडी क. एमएच–31/सीक्यु–6049 कि. 1,20,000/–रू. असा एकुण 1,43,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोशि अनिल सपाटे पो. सटे. रामटेक यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1),11(1)(ए),11(1)(बी),11(1)(ई),11(1)(आय),11(1)(एफ) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांचा आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक दिपक यादव 9637772404 हे करीत आहे.





# नैसर्गिक विज पडुन मृत्यू

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत मौजा गुमथी शेत शिवार येथे दिनांक 10/08/2020 चे 17.00 वाजता फिर्यादी नामे– मधुकर भावराव चौधरी, वय 52 वर्ष, रा. वार्ड क्र 03 गुमथी तह कामठी यांची वहिनी मृतक नामे– श्रीमती रेखा दिगंबर चौधरी, वय 48 वर्ष रा वार्ड क्र 02 गुमथी तह कामठी या नेहमी प्रमाणे गावातील दिपक सोनेकर यांचे शेतामध्ये मजुरीने त्यांच्या शेतात असलेल्या पराटीला खात टाकुन घरी परत येत असतांना त्या हरी शेवारे यांचे शेतामध्ये पोहचल्या तेव्हा अचानक वादळी पाऊस आल्याने त्यांच्या अंगावर नैसर्गिक विज पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार गुरूप्रकाश मेश्राम 9823453169 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर